# जलसाक्षरतेचा 'रणदुल्लाबाद पॅटर्न'

## भूजल पातळीचे यशस्वी नियोजन करत गावचा आलेख उंचावला

**मधुबन पिंगळे, पुणे**

**मटा विशेष**

सलग दुसऱ्या वर्षी कमी पाऊस झाल्याने सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, कोरेगाव तालुक्यांमधील टँकर सुरूच राहतील, हे जुलैमध्येच स्पष्ट झाले होते. मात्र, पंधरा वर्षांपूर्वीच केलेली बोअरबंदी, विहिरींचा सामाईक वापर आणि त्यानंतर भूजल संवर्धनातून कोरेगाव तालुक्यातील रणदुल्लाबाद या गावाने जलसाक्षरतेचा नवा आदर्श उभा केला आहे. मात्र, या दुष्काळातही टँकरमुक्ती आणि बंपर उत्पन्नाची हमी या रणदुल्लाबादच्या यशाकडे परिसरातील गावांनी धडा घेतलेला नाही. पाण्यासाठी टँकरची वाट पाहणे आणि बोअरिंगमधून जमिनीतून पाण्याचा शोध घेणे, यामध्येच अन्य गावे गुरफटलेली दिसून येतात.



**पावसाचे पाणी जिरण्यासाठी रणदुल्लाबादचे गावकरी सातत्याने पाणलोटाची कामे पूर्ण करीत असतात.**

सातारा जिल्ह्यातील दुष्काळप्रवण विभागात मोडत असल्यामुळे रणदुल्लाबादच्या गावकऱ्यांनी पाण्याचे महत्त्व अनेक वर्षांपासून जपले आहे. विहिरींच्या खोदाईचा खर्च आणि मर्यादित गरज लक्षात घेऊन ६०-७० वर्षांपासून हे गावकरी शेतीसाठी विहिरींचा सामाईक वापर करतात. यातच बोअरची खोली वाढविण्याच्या नादात बोअर आणि विहिरी दोन्हींमध्येही पाण्याचा खडखडाट होत असल्याची जाणीव या गावकऱ्यांना

वेळीच झाली. त्यामुळे १५ वर्षांपूर्वी गावकऱ्यांनी बोअरबंदीचा निर्णय राबविला. यानंतरही भूजलाचा पुरेपूर वापर करण्याची संधी या गावकऱ्यांना खुणावत होती. त्यातूनच पाणलोटाचा विकासासाठी गावकऱ्यांनी प्रयत्न सुरू केले. याच काळात जय हनुमान पाणलोट समितीही आकाराला आली. चार वर्षांपूर्वी 'बाएफ'च्या मदतीने पाणलोट क्षेत्रामध्ये मातीचे बंधारे, नालाबंदी ही कामे पूर्ण केली. दोन वर्षांपूर्वी 'अॅक्वॅडॅम'चाही या कामांमध्ये सहभाग आला आणि विहिरींची पातळी-पाण्याचा दर्जा तपासणे, हवामानाच्या नोंदी घेणे, यांना सुरुवात झाली. 'पाण्याचे नियोजन, हवामानाचा अंदाज यांमुळे मागील काही वर्षांतच आमच्या गावाचे उत्पन्न सुमारे ५० टक्क्यांनी वाढले आहे,' असे पाणलोट समितीचे अध्यक्ष मंगेश जगताप यांनी सांगितले.

'गावकऱ्यांमध्ये भूजलाविषयी आता पूर्ण जागरुकता आली असून, पाण्याच्या पातळीमध्ये होणाऱ्या बदलाबरोबर ते आता कोणते पिक घ्यायचे, हा निर्णयही घेत आहेत. त्यामुळे त्यांचा अधिक फायदा होत आहे,' अशी प्रतिक्रिया 'अॅक्वॅडॅम'चे डॉ. हिमांशू कुलकर्णी आणि उमा आसलेकर यांनी दिली.

रणदुल्लाबादचे हे यश असतानाच, शेजारच्याच एका गावातील बोअरची संख्या सातेशवर गेली आहे. या गावांच्या रस्त्यावर पाण्याचे टँकर वेळोवेळी दिसून येतात.

### स्थानिक वेधशाळेचे यश

गावातील भूजलाचा अभ्यास करण्याबरोबरच हवामानाच्या सर्व नोंदी करण्यासाठी 'अॅक्वॅडॅम'ने गावामध्ये एक हवामान केंद्रही बसवले आहे. पाणलोट समितीचे उपाध्यक्ष विजय शिंदे या केंद्रातून नोंदी घेतात. आर्द्रता किंवा किमान तापमानातील बदल यांचा विचार करून, आता पिकांना औषधांची गरज किती, याचा अंदाज शेतकरी घेतात, असे निरीक्षण शिंदे यांनी या वेळी सांगितले.